महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## अभ्यास आणि प्रवासास नागपूर मेट्रोच ठरतेय आधार




नागपूर: नागपुरात मेट्रो प्रकल्पाच्या माध्यमाने किफायतशीर आणि सुखकर प्रवासाची सोय झाल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये जाणे अतिशय सुविधेचे झाले आहे. सोबतच विद्यार्थ्यांकरिता महा कार्डवर ३०% सवलत देण्यात आली आहे, त्यामुळे ते खिशाला परवडणारे देखील आहे. सेलिब्रेशन ऑन व्हील्स बुकिंगवर विशेष सूट अश्या विविध सोयी-सवलती नागपूर मेट्रोने विद्यार्थी वर्गाला दिल्या आहेत. एकीकडे या माध्यमाने विद्यार्थ्यांचा प्रवास सुकर होत

असतानाच, दुसरीकडे नागपूर मेट्रोच्या मदतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबींची पूर्तता करताना या प्रकल्पाचा सर्व बाजूने अभ्यास करण्यासाठी लाभ होतो आहे. अशाप्रकारे महा मेट्रो प्रकल्प विद्यार्थ्यांसाठी सर्व दृष्टीने लाभदायक ठरले आहे.

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून शहर आणि परिसरातील महाविद्यालयातील विद्यार्थी नागपूर मेट्रो प्रकल्पाला भेट देत असून या माध्यमाने नवीन बाबी आत्मसात करायचा प्रयत्न करीत आहेत. मनोरमा मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, जी एस रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीरिंग अँड टेक्नोलोंजि, धरमपेठ पॉलीटेक्नीक कॉलेज, कवीकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलोंजि अँड सायन्स, डॉ आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडी अँड रिसर्च च्या विद्यार्थ्यांनी मेट्रो भवन ला भेट देत प्रकल्पा संबंधी विविध बाबी जाणून घ्यायचा प्रयत्न केला.

मेट्रो भवन ला भेट देणाऱ्या आर्किटेक्चर (स्थापत्य शास्त्र) च्या विद्यार्थ्यांनी मेट्रो भवन च्या बांधकामाला बद्दल माहिती घेतली. या इमारतीच्या स्थापत्य शास्त्र संबंधित असलेले विविध बारकावे समजून घेतले. मेट्रो भवन ला विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या सोबत आलेल्या शिक्षकांनी अनुभूती केंद्र, वाचनालय, सभागृह, ऑपरेशन कंट्रोल सेंटर अश्या विविध भागांना भेट दिली. या प्रत्येक भागाचे वैशिष्ठ्ये जाणून घेतली. मेट्रो भवन येथील प्रकल्पाचे मॉडेल्स, सर्क्युलर गॅलरी, कॉन्फरन्स रूम, पार्किंग व्यवस्था, आऊटडोअर गॅलरी, टेरेस गार्डन, कॅफेटेरिया सारखे खंड बघितले.

मेट्रो भवन येथील विविध सोइ आणि या इमारतीची एकूणच संरचना बघून विद्यार्थी प्रभावित झाले. या इमारतीचे स्थापत्य शास्त्र आणि एकूणच बांधकाम उत्कृष्ट असल्याचे मत विद्यार्थी आणि त्यांच्या शिक्षकांनी व्यक्त केले. मेट्रो भवनला आणि या या प्रकल्पाला पार्ट एकदा भेट द्यायला आपल्याला आवडेल, असे मत या विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.



